# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. १०२/२०२५

**विषय : सर्व संलग्नित महाविद्यालयांचे ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२४ चे औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र या विद्याशाखांचे आणि एप्रिल/मे-२०२५ च्या परीक्षांची सर्व विद्याशाखांची देयके संगणकीय प्रणालीद्वारे सादर करणेबाबत.**

परीक्षा खर्चाची देयके विद्यापीठास सादर करण्यासाठी विद्यापीठाने संगणकीय कार्यप्रणाली तयार केलेली आहे, सदर संगणकीय कार्यप्रणाली प्रायोगिक तत्वावर **ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२४ च्या परीक्षांची औषधनिर्माणशास्त्र आणि वास्तुशास्त्र** या विद्याशाखांच्या महाविद्यालयांनी परीक्षा खर्चाची देयके ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची आहे. परीक्षा खर्चाची देयके ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यासाठी महाविद्यालयाच्या बीओडी लॉगिनमध्ये सदर कार्यप्रणाली उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच, **एप्रिल/मे-२०२५ पासून सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांनी सर्व विद्याशाखांची परीक्षा खर्चाची देयके संगणकीय कार्यप्रणालीमधून ऑनलाईन पद्धतीने सादर करणे अनिवार्य आहे.**

सदर संगणकीय कार्यप्रणाली विद्यापीठ परीक्षा विभागाचे Handbook of Remuneration for Examination work Booklet-2019 मधील नियमानुसार तयार करण्यात आलेली आहे. परीक्षा खर्चाची देयके ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यासाठीची प्रशिक्षण कार्यशाळा दि. ०७/०३/२०२५, १०/०३/२०२५ आणि १२/०३/२०२५ अनुक्रमे नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे येथे घेण्यात आलेली होती. संगणकीय कार्यप्रणालीमध्ये परीक्षा खर्चाच्या देयकांची माहिती कोणत्या पद्धतीने भरावयाची आहे, याबाबत उपयोगकर्ता पुस्तिका आणि व्हिडीओ आपल्या महाविद्यालयाच्या बीओडी लॉगिनमध्ये दिलेला आहे. संगणकीय कार्यप्रणालीतून परीक्षा आयोजनाचे देयक सादर करण्यासाठी विद्यापीठाने विहीत कालमर्यादा परिपत्रक क्र.१४३/२०२४ दि.२६/०६/२०२४ मध्ये निश्चित केलेला असून, त्यानुसार देयके वेळेत सादर करावयाची आहेत.

ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२४ च्या परीक्षांची औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र या विद्याशाखांच्या महाविद्यालयांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने देयक तयार करुन त्याचे लेखापरीक्षण करुन वित्त व लेखा विभागात सादर करावीत. संगणकीय कार्यप्रणालीमधून देयक सादर केल्यानंतर जमाखर्चपत्रक, लेखापरीक्षण अहवाल आणि सर्व परिशिष्टे सोबत जोडून वित्त व व लेखा विभागास सादर करावीत. ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२४ च्या परीक्षांची औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्राच्या ज्या महाविद्यालयांनी याआधीच विद्यापीठ परीक्षा खर्चाचे देयक ऑफलाईन पद्धतीने सादर केलेले आहे, त्यांनी ऑनलाईन पद्धतीने देयक सादर करावे. ऑनलाईन पद्धतीने परीक्षा खर्चाचे देयक सादर करताना खालीलपैकी कोणतीही अडचण आल्यास, विद्यापीठास ई-मेलद्वारे संपर्क करावा.

| अ.क्र. | अडचणीचे स्वरुप | ई-मेल |
|---|---|---|
| १. | विद्यार्थीसंख्या | examcollegesupport@unipune.ac.in |
| २. | संगणकीय प्रणाली | remuneration_support@unipune.ac.in |
| ३. | परीक्षा मानधनाचे दर अथवा नियम | examfinance@unipune.ac.in |

**कळावे,**

गणेशखिंड, पुणे-४११००७
**जा. क्र. :** वित्त/२०२५-२६/२५
**दिनांक :** ०९/०४/२०२५

सीएमए (डॉ.) चारुशीला गायके
**वित्त व लेखा अधिकारी**

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१. मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये
२. मा. संचालक, विद्यापीठाशी संलग्नित मान्यताप्राप्त सर्व परिसंस्था
३. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ

आपणांस विनंती की, सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

\\Admin7\f\d\d\anil backup\AMOL GHODE\A.F.O. Chordiya Sir\Paripatrak.docx